# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
### वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 17.10.2024** **वार – गुरुवार**

---

Pcmc

पिंपरी चिंचवड महापालिकेनं २०५०पर्यंत कार्बन उत्सर्जन शून्यावर आणण्याचं उद्दिष्ट ठेवलं असून; त्या अनुषंगानं वातावरणीय कृती कक्ष स्थापन करण्याच्या विषयाला प्रशासक शेखर सिंह यांनी विशेष बैठकीत मान्यता दिली. शाश्वतता विभागा अंतर्गत स्थापन करण्यात येणाऱ्या या कक्षाच्या समितीमध्ये महापालिका अधिकारी कर्मचाऱ्यांचा समावेश असेल. महापालिका आयुक्त या समितीचे अध्यक्ष असतीळ. समितीमध्ये स्वयंसेवी संस्था, संघटना, तसंच या विषयातील तज्ञ प्रतिनिधींचाही समावेश करण्यात येणार आहे. शहरीकरणाचा वेग वाढल्याने पिंपरी चिंचवडची लोकसंख्याही वेगाने वाढते आहे, त्याचबरोबर वाढतं तापमान, अतिवृष्टी, पूर, गारपीट अशा पर्यावरणीय संकटांचा सामनाही शहराला करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर वातावरणीय कृती कक्ष स्थापन्न करण्याचा निर्णय महापालिकेनं घेतला आहे.

**साखर आयुक्त**

अद्ययावत तंत्रज्ञानाच्या मदतीने साखर उत्पादनाव्यतिरिक्त अन्य उपपदार्थ आणि उत्पन्नाचे नवनवे स्त्रोत निर्माण करणं ही आता काळाची गरज आहे. त्यादृष्टीने साखर उद्योगाने सौरउर्जा प्रकल्पाची उभारणी करण्यासाठी पुढे यावं असं आवाहन साखर आयुक्त डॉक्टर कुणाल खेमनार यांनी केलं. या संदर्भात साखर आयुक्तालयात झालेल्या एका महत्त्वपूर्ण बैठकीत ते बोलत होते.

**<u>माध्यमकक्ष</u>**

राज्यात विधानसभा निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू झाली असून निवडणूक प्रक्रियेमध्ये माध्यम कक्षाची भूमिका खूप महत्त्वाची आहे, असं  पुण्याचे जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी म्हटलं आहे. निवडणूक प्रक्रिया पार पाडताना माध्यम कक्ष समन्वय अधिकाऱ्यांनी निरपेक्ष  आणि पारदर्शकपणे काम करावं, असे निर्देश डॉ. दिवसे यांनी दिले. जिल्ह्यातील २१ विधानसभा मतदार संघातील माध्यम कक्ष समन्वय अधिकाऱ्यांच्या बैठकीत ते काल बोलत होते.

**<u>दीपक मानकर</u>**

राज्यपाल कोट्यातून आमदार म्हणून नियुक्ती करण्याची मागणी पूर्ण न झाल्याने राष्ट्रवादी काँग्रेसचे पुणे शहराध्यक्ष दीपक मानकर यांनी शनिवारपर्यंत शहराध्यक्ष पदाचा राजीनामा देणार असल्याचं सांगत पक्षावर नाराजी व्यक्त केली आहे. मानकर यांची विधान परिषदेवर नियुक्ती करावी अशी मागणी पदाधिकाऱ्यांनी पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांच्याकडे केली होती. मात्र ही नियुक्ती न झाल्याने काल सुमारे 600 पदाधिकाऱ्यांनी पक्षाचा राजीनामा दिला आहे.

**<u>ब्राह्मण</u>**

पुण्यातील कसबा विधानसभा मतदारसंघात ब्राह्मण समाजातील व्यक्तीला उमेदवारी द्यावी अशी मागणी सकल ब्राह्मण समाजानं भाजपाकडे केली आहे. समन्वयक भालचंद्र कुलकर्णी यांनी या संदर्भातील मागणीचं पत्र भाजपा नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,  चंद्रकांत पाटील आणि भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना पाठवलं आहे.

**<u>हिमोग्लोबिन</u>**

विद्यार्थिनींनी हिमोग्लोबिनचं प्रमाण संतुलित ठेवण्यासाठी फळे, कंदमुळे  हिरव्या भाज्या असा संतुलित आहार वेळेवर घेतला पाहिजे; तसंच प्रत्येक विद्यार्थिनीनं आपल्या शरीराची स्वच्छता राखली पाहिजे,

असा सल्ला आरोग्य अधिकारी डॉक्टर मेघा रास्ते यांनी दिला. पुण्यात सखी सावित्री मंचच्या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. आठवी, नववी, आणि दहावीतील विद्यार्थिनी आणि त्यांच्या माता पालक भगिनींचा हा मेळावा पुण्यात नुकताच पार पडला. यात ४० माता पालक आणि ६० विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

**<u>परिसंवाद</u>**

व्यसनाधीनता मुळापासून संपवण्यासाठी अंतर्मनातून परिवर्तनाची ओढ गरजेची आहे असं मत डॉक्टर सचिन परब यांनी आज केलं. एमआयटी विश्वशांती विद्यापीठ आणि प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयानं व्यसनाधीनता आणि व्यसनमुक्तीची वैधानिक प्रक्रिया या विषयावर एका परिसंवादाचं आयोजन केलं होतं. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉक्टर परब बोलत होते. व्यसन मुक्तीसाठी आत्मविश्वास, कुटुंबातील सदस्यांचा पाठिंबा आणि जीवनशैली बदलणं आवश्यक आहे, असंही डॉक्टर परब यांनी सांगितलं.

**<u>क्रीडा</u>**

पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या मान्यतेने  ग्रेसीया करंडक खुली आंतर क्लब टी -20 क्रिकेट स्पर्धा पुण्यात सध्या सुरू आहे. या स्पर्धेत विपुल खैरे याने केलेल्या अष्टपैलु खेळीमुळे लिजंड्स स्पोटर्स क्लबने स्केलअप ब संघाचा ३ गडी राखून पराभव केला. अन्य एका सामन्यात दिलीप यादव याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर माव्हरीक्स् यंगस्टर्स क्लबने लिजंड्स क्रिकेट ॲकॅडमीचा १० गडी राखून सहज पराभव करत विजयी सलामी दिली.

**<u>परतीचा पाऊस</u>**

राज्यातल्या शेतक-यांना परतीच्या पावसाचा मोठा फटका बसला असून ऑक्टोबरमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे राज्यातल्या सुमारे ३० हजार ५०६ हेक्टरवरील पिकांचं नुकसान झालं आहे. ठाणे, नाशिक, सांगली आणि भंडारा या चार जिल्हयांमध्ये मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे. नाशिक जिल्हयातील २६ हजारांहून अधिक हेक्टरवरील पिकांचं नुकसान झालं आहे. काढणीला आलेल्या सोयाबीन पिकाला याचा सर्वात मोठा फटका बसला आहे, अशी माहिती पुणे कृषी संचालक रफिक नायकवडी यांनी दिली.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल 32 तर किमान 22 पूर्णांक 3 दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. उद्याही तापमान साधारण असंच असेल. त्याचबरोबर आकाश अंशतः ढगाळ राहील आणि हलक्या स्वरुपाचा पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता ताज्या पुणे वृत्तांतसह.**

**नमस्कार.**